भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित) गट-क व गट-ड संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील पदे सरळसेवेने भरण्याबाबतच्या एकत्रित मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ(सेवा-४)**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०२६.**

वाचा :-

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ४ मे, २०२२.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: प्रानिमं १२२२/प्र.क्र.१३६/का.१३-अ, दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२.
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ०२ डिसेंबर, २०२५.

**प्रस्तावना:-**

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ४ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित) गट-क व गट-ड संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील पदे सरळसेवेने भरण्याबाबतच्या एकत्रित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयामधील परि.क्र.११ मध्ये दिनांक २ डिसेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये “निवडसूचीची कालमर्यादा” अंतर्गत (अ) मध्ये केलेल्या सुधारणांमध्ये स्वयंस्पष्टता आणण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे:-

" निवड समितीने तयार केलेली निवडसूची, २ वर्षासाठी किंवा नवीन सूची तयार करण्यासाठी सेवाभरतीची जाहिरात देण्यात येईल, त्या दिनांकापर्यंत यापैकी जो दिनांक आधी घडेल, त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य ठरेल. तसेच ही मुदतवाढ, निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत, त्या पदांपुरतीच असेल.

२. सदर शासन निर्णयाच्या तरतूदी दिनांक २ डिसेंबर, २०२५ पासून लागू असल्याने त्यापूर्वीच्या निवडसूच्यांच्या बाबतीत वरीलप्रमाणे सुधारणा लागू करण्याबाबत प्रशासकीय विभागांकडून प्रस्ताव प्राप्त होत आहेत. त्याअनुषंगाने संदर्भाधीन क्र.३ येथील शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

दिनांक ४ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित) गट-क व गट-ड संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील पदे सरळसेवेने भरण्याबाबतच्या एकत्रित मार्गदर्शक सूचनांमधील परि.क्र.११ मध्ये सामान्य प्रशासन

विभागाच्या दिनांक २ डिसेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये “निवडसूचीची कालमर्यादा” अंतर्गत (अ) मध्ये केलेल्या **“निवड समितीने तयार केलेली निवडसूची २ वर्षांसाठी किंवा नवीन सूची तयार करण्यासाठी सेवाभरतीची जाहिरात देण्यात येईल, त्या दिनांकापर्यंत यापैकी जो दिनांक आधी घडेल, त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य ठरेल. तसेच ही मुदतवाढ निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत, त्या पदांपुरतीच असेल,”** या तरतूदीपुढे खालीलप्रमाणे तरतूद समाविष्ट करण्यात येत आहे:-

> **"सदर सुधारणा दिनांक २ डिसेंबर, २०२५ रोजी, ज्या निवडसूचींना २ वर्षांचा कालावधी झालेला नाही व निवडसूची तयार करताना विचारात घेतलेली पदे अद्यापपर्यंत पूर्णत: भरण्यात आलेली नाहीत, अशा निवडसूचींना लागू असेल."**

२. दिनांक ४ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयातील इतर मार्गदर्शक सूचना कायम राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०२०२१८३००१६८०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUCHITA MOHAN MAHADIK

Digitally signed by SUCHITA MOHAN MAHADIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=6578e224c4a0d2c9bfb7e7e33b474757c1425d0a03e653bc4f0a25b70698158e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E146A6DDC8FB6681D49A5099661D41639DA6C568419F071BB9CDFD8A2E08058C, cn=SUCHITA MOHAN MAHADIK
Date: 2026.02.02 18:31:01 +05'30'

**(सु. मो. महाडिक)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
३) मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण व सार्वजनिक बांधकाम (सा.उ.))यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
४) मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क)यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
५) सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
६) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
७) सर्व मा.संसद सदस्य, मा.विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
८) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
९) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१०) सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना)- त्यांनी हा शासन निर्णय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावा.
११) प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१२) प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१३) प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१४) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
१५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१६) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
१७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद) मुंबई,
१८) राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,

१९) सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
२०) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई,
२१) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई,
२२) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र/नागपूर,
२३) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र/नागपूर,
२४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीकरिता ५ प्रती),
२५) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६वा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१०प्रती)
२६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२७)निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२८)मुख्य लेखापरीक्षक (निवासी लेखे), कोकण भवन, नवी मुंबई,
२९) सर्व जिल्हाधिकारी,
३०) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३१) सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख (मंत्रालयीन विभागामार्फत),
३२) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
३३) निवडनस्ती.

------